अतारांकित प्रश्नोत्तरांची ९४ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

आरोग्य विभागात प्रकल्पग्रस्त असणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांना बहूउद्‌देशीय कर्मचारी म्हणून सेवेत सामावून घेण्याबाबत

(१) ३२२४७ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य विभागात प्रकल्पग्रस्त असणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांना सन १९९९ या कालावधीत बहूउद्‌देशीय कर्मचारी म्हणून जवळपास २२०० प्रकल्पग्रस्तांना थेट नियुक्त्या दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त २२०० कर्मचाऱ्यांपैकी ५% कोटा पूर्ण झाल्याची सबब दाखवून १४६ पात्र नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांना सेवेत रुजू करून घेतले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कर्मचा-यांना सेवेत सामावून घ्यावे या मागणीसाठी त्यांनी मा.उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले असता मा.उच्च न्यायालयाने त्यांना सेवेत सामावून घेण्याचे आदेश देऊनही त्यांना सामावून घेतले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी आरोग्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १९ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे व मेल पाठवून केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१७-०५-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय हिवताप प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत जिल्हा हिवताप अधिकारी यांनी प्रकल्पग्रस्त कोटयातून १६२ उमेदवारांना बहुउद्‌देशीय आरोग्य कर्मचारी या पदावर नेमणूका दिलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर १४६ उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आले नव्हते. सदर उमदेवारांना शिफारसपत्र देण्यात आले होते.

(३) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रकल्पग्रस्त कोटयातील उमेदवारांनादेखील सरळसेवेने परिक्षा देवून शासन सेवेत समाविष्ठ होणे आवश्यक आहे. तसेच, मा.उच्च न्यायालयाने सदर उमेदवारांना सामावून घेण्याबाबत आदेशित केले नव्हते.

(४) हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणी मा.न्यायालयाचा निर्णय व वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून शासन स्तरावर प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

सेंच्युरी रेयॉन कंपनीने वालधुनीचे पात्र भराव टाकून बुजवले असल्याबाबत

(२) ३२७५९ (१४-०२-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वालधुनी नदीकिनारी सेंच्युरी रेयॉन कंपनीची जागा सन २००० पासून कंपनीच्या माध्यमातून येथे भराव टाकण्याचे काम सुरू असून सदर कंपनी व्यवस्थापनाने मोकळ्या जागेबरोबरच वालधुनीच्या पात्रातही भराव टाकण्याचे सत्र सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे पावसाळ्यात योगीधाम, त्रिमुर्ती कॉलनी, अनुपमनगर, घोलपनगर या भागांतील नागरीवस्त्यांमध्ये पुराचे पाणी शिरुन नागरीकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सेंच्युरी रेयॉन कंपनीवर तसेच सदर प्रकरणात असलेल्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०८-०४-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

पिक विम्याबाबत राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे तक्रार दाखल केल्याबाबत

(३) ३३२६२ (०७-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागात माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस व अतिवृष्टीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना खरीप २०२० चा पीक विमा मिळण्याबाबत दिनांक १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकांचे नुकसान झाल्याचे महसूल व कृषी विभागाच्या पंचनाम्यानुसार व राष्ट्रीय / राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या माध्यमातून करण्यात आलेल्या मदतीच्या आकडेवारीनुसार स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी कृषी आयुक्तांनी विमा कंपनीस पत्र पाठवून प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभाग घेतलेल्या शेतकऱ्यांपैकी ज्या शेतकऱ्यांना विमा कंपनीमार्फत स्थानिक नैसर्गिक आपत्ती व काढणीपश्चात नुकसान भरपाई अदा केलेली आहे असे शेतकरी वगळून ज्या शेतकऱ्यांचे नुकसानीचे पंचनामे स्थानिक प्रशासनामार्फत करण्यात आले ते विचारात घेऊन अशा सर्व शेतकऱ्यांना क्षेत्र घटकानुसार (Area approach) नुकसान भरपाई अदा करण्याबाबत तात्काळ कार्यवाही करून त्याचा अहवाल जिल्हा प्रशासनास व कृषी आयुक्तालयास सादर करण्याची सूचना दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (कृषी) अध्यक्ष असलेल्या राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे गंभीर स्वरूपाच्या तक्रारी, एकाहून अधिक जिल्ह्यांशी संबंधित तसेच नुकसानीची व्याप्ती रु. २५ लाखांहून अधिक असेल अशा तक्रारी राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे सादर करतील. राज्यस्तरीय समिती तक्रार प्राप्त झाल्यानंतर तात्काळ निकाली काढेल. समितीचा निर्णय सर्व घटकांना मान्य असेल." असा उल्लेख आहे त्यामुळे याबाबत सुनावणी घेऊन आदेश देण्याचे अधिकार प्रधान सचिव, कृषी यांना आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, दिनांक ०७ सप्टेंबर, २०२१ रोजी देण्यात आलेल्या लोकप्रतिनिधींनीच्या पत्राबाबत प्रधान सचिव, कृषी यांना काय कार्यवाही करणे अपेक्षित आहे, तसेच त्यांनी याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.दादाजी भुसे (२२-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे आहे.
(५) दिनांक ७.०९.२०२१ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मा.विधानसभा सदस्य यांना दिनांक २४.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रकरणाची वस्तुस्थिती कळविण्यात आलेली आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी राज्यस्तरीय तक्रार निवारण समितीकडे दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे अर्ज दाखल करण्याबाबत दिनांक ०७.३.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे जलचक्र (ता.बोदवड, जि.जळगांव) येथील मे. महालक्ष्मी स्टोन क्रशरने शासनाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडविल्याबाबत

(४) ३३३२३ (०६-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे जलचक्र (ता.बोदवड, जि.जळगांव) येथील मे. महालक्ष्मी स्टोन क्रशरने शासनाचा कोटयावधी रुपयांचा महसूल बुडविल्याबाबत चौकशी करण्याकरिता जिल्हयाधिकाऱ्यांनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान एका चौकशी समितीची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदरहू चौकशी समितीच्या अहवालात काय आढळून आले आहे, त्याअनुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०८-०४-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) चौकशी समितीने त्यांचा अहवाल अपर जिल्हाधिकारी, जळगांव यांना सादर केला असून, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, जळगांव यांच्यामार्फत कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

नळदुर्ग (ता. तुळजापूर, जि.उस्मानाबाद) येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरु करण्याबाबत

(५) ३३७२५ (१०-०१-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तालुक्याच्या विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पुर्नरचना समिती गठीत करण्यात आली असून सदरहू समितीचा तालुका निर्मिती/पुर्नरचना करण्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तुळजापूर (जि.उस्मानाबाद) तालुक्यात १२३ गांवे व २ मोठी शहरे असून नळदुर्ग (ता. तुळजापूर) येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी मागणी केली असतानाही याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अतिरिक्त तहसिल कार्यालय अद्याप मंजूर न करण्याचे कारण काय आहे, याबाबत चौकशी करून नळदुर्ग येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) नळदुर्ग येथे अतिरिक्त तहसिल कार्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून वित्त विभागाच्या सहमतीने व शासन मान्यतेने त्यावर निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत हुंड्यासाठी महिलांवर अत्याचार केल्यामुळे जीव गमवावा लागण्याबाबतची घटना

(६) ३३८०१ (०७-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत हुंड्यासाठी महिलांवर अत्याचार केल्यामुळे ४३ पेक्षा जास्त महिलांना जीव गमवावा लागल्याने त्यास दोन वर्षाचा कालावधी झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन किती व्यक्तींना अटक करण्यात आले आहे, तसेच अटक करण्यात आलेल्या व्यक्तींविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-०५-२०२२) : (१) सन २०१९ ते २०२१ या कालावधीत हुंड्यासाठी अत्याचाराने मृत्यु झालेल्या महिलांचा सांख्यिकी अहवाल खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र	वर्ष	हुंडयासाठी अत्याचाराने मृत्यु झालेल्या महिलांची संख्या
१	२०१९	१५
२	२०२०	१३
३	२०२१	१९

(२) मुंबई पोलीसांनी हुंडयासाठी महिलांवर अत्याचार केल्यामुळे मृत्यु झाल्याबाबत तात्काळ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. सदर गुन्हयांतील आरोपींना अटक करुन त्यांच्या विरोधात मा.न्यायालयाकडे दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे. सन २०१९ ते २०२१ या कालावधीत अटक आरोपी व त्यांचेवर केलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईबाबतचा सांख्यिकी अहवाल खालील प्रमाणे.

अ.क्र	वर्ष	हुंडयासंदर्भात मृत्युच्या गुन्हयात अटक आरोपीतांची संख्या	प्रतिबंधात्मक कारवाई
१	२०१९	४२	५
२	२०२०	३६	७
३	२०२१	३९	१२

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पुण्यात एका मुलीचे रिक्षाचालकाने अपहरण करुन बलात्कार केल्याबाबत

(७) ३३८३१ (०७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यात रेल्वे स्थानकातून १४ वर्षीय मुलीचे रिक्षाचालकाने अपहरण केले तसेच या बलात्काराच्या घटनेसह इतरही प्रकरणांमुळे राज्यात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहनांमध्ये व्हीटीएस, पॅनिक बटन तसेच रिक्षाचालकांच्या मागील बाजूस आवश्यक असलेला माहिती फलक लावण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महिलांच्या सुरक्षेबाबत तातडीने घोषणांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१७-०५-२०२२) : १) याबाबत वानवडी पोलीस स्टेशन, पुणे येथे १९ आरोपींविरूध्द भा.द.वि. कलम ३६३, ३७६ (ड, अ), ३७७, १०७, ११४, ३४ व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४ (२), ५ (ग), ६, ८, १२, १७ प्रमाणे गु.र.क्र. ३०३/२०२१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील १९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.
२) याकडे दुर्लक्ष केले जात नसून नियम मोडणारे रिक्षा चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. तसेच वाहनांमध्ये व्हीटीएस पॅनिक बटन व रिक्षाचालकांचे मागील बाजुस आवश्यक असलेल्या माहिती फलक रिक्षांमध्ये लावण्यात यावा याबाबत कारवाई करण्यात येते.
३) पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या सर्व पोलीस स्टेशन हद्दीतील महिला व मुली यांचे सुरक्षेकामी पोलीस दलातील महिला कर्मचारी यांची दामिनी मार्शल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच त्यांना पोलीस स्टेशन हद्दीमध्ये २४ तास गस्त ठेवून महिला व मुली यांना संरक्षण देण्यासंदर्भात योग्य ते आदेश देण्यात आलेले आहेत. पोलीस स्टेशन हद्दीत सर्व शाळा व कॉलेजेस मध्ये महिला दामिनी मार्शल्स या प्रत्यक्ष जावून सुरक्षिततेविषयी जागृती करण्याचे काम करत आहेत.
४) प्रश्न उद्भवत नाही.

गरजदरी (ता.चिखलदरा, जि.अमरावती) धरणालगत गौण खनिजाचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

(८) ३४०७८ (१०-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गरजदरी (ता.चिखलदरा, जि. अमरावती) धरणालगत गौण खनिजाचे अवैध उत्खनन होत असल्याने धरणाला मोठया प्रमाणात धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने अवैध गौणखनिज उत्खनन रोखण्यासह अवैधरित्या उत्खनन करणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०८-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्हयातील संत्रा या फळपिकाच्या गळतीबाबत

(९) ३४०८८ (०७-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयात दरवर्षी संत्रा मोसमामध्ये वातावरणीय बदलामुळे संत्र्यांची मोठया प्रमाणात गळती होत असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संत्रा गळतीवर खास उपाययोजना करुन संत्रा गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (१२-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
(२) क्षेत्रिय स्तरावरुन अमरावती विभागात संत्रा फळगळीबाबत समस्या उद्भवल्याचे निदर्शनास आल्यानंतर फलोत्पादन विभागामार्फत संत्रा गळतीवर सर्व भागधारकांच्या एकत्रित प्रयत्नातून उपाययोजना करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या. तसेच, मा.कुलगुरु, डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचेकडील शास्त्रज्ञ व कृषि विभागातील अधिकारी यांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्यात आली असून समितीची प्रथम बैठक दिनांक ०४.०१.२०२२ रोजी झाली असून समितीमध्ये सर्वानुमते निर्णय होऊन संत्रा फळगळ उपाययोजनेबाबत सूचना केल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि.सांगली) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदे भरण्याबाबत

(१०) ३४६६४ (०७-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुक्यातील पशुधन सर्वाधिक म्हणजे सुमारे ३,५५,९३८ इतके असून २३ पशुवैद्यकीय दवाखान्यांतील पशुसेवेसाठी ३० पदे मंजूर असताना कार्यरत पदे फक्त १२ असून १८ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील १४,०६,९१० पशुधनासाठी कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची संख्या पहाता १ कर्मचा-यावर सरसरी १८,०३७ जनावरांची जबाबदारी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे पशुधनाला पशुवैदयकीय सेवा मिळत नसल्याने पशुसेवेतील मंजूर असलेली रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (१९-०४-२०२२) : (१) राज्यातील २० व्या पशुगणनेनुसार जत (जि. सांगली) तालुक्यात ६५,६५४ इतके पशुधन घटक असून, त्यांना २३ पशुवैद्यकीय दवाखान्यांद्वारे पशुसंवर्धन विषयक सेवा पुरविल्या जातात. सदरहू दवाखान्यांतील पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे-

पद	मंजूर	भरलेली	रिक्त
पशुधन विकास अधिकारी	१५	०६	०९
सहायक पशुधन विकास अधिकारी	०३	०३	००
पशुधनपर्यवेक्षक	१२	०५	०७
एकूण	**३०**	**१४**	**१६**

(२) २० व्या पशुगणनेनुसार सांगली जिल्हयात एकूण ८,८७,७३४ इतके पशुधन घटक असून, जिल्हयातील १५३ पशुवैद्यकीय संस्थांमधील पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे -

पद	मंजूर	भरलेली	रिक्त
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त	०१	०१	००
सहायक आयुक्त पशुसंवर्धन	०९	०६	०३
पशुधन विकास अधिकारी	१०२	५७	४५
सहायक पशुधन विकास अधिकारी	०३	०३	००
पशुधन पर्यवेक्षक	१२	०५	०७
व्रणोपचारक	२६	२३	०३
परिचर	६९	४७	२२
एकूण	**२११**	**१०९**	**१०२**

(३) पशुवैद्यकीय दवाखान्यातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार नजिकच्या पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सोपवून शेतकऱ्यांना तसेच पशुपालकांना नियमीतपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात येत असून, पशुवैद्यकीय सेवा मिळत नसल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच विभागातील पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गातील २१२ रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जाहिरात क्र.१२/२०२२ प्रसिद्ध करण्यात आली असून, यादवारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

शेलूबाजार (ता.जि.वाशिम) येथील जुन्या वस्तीत तीन ठिकाणी चोरी झाल्याबाबत

(११) ३५२५५ (०७-०१-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलूबाजार (ता.जि.वाशिम) येथील जुन्या वस्तीत तीन ठिकाणी चोरी झाल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चोरीमध्ये दागिन्यांसह एकूण २ लाख ४० हजार रुपये किंमतीचा ऐवज पळविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी तपास करुन चोरट्यांना अटक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१९-०५-२०२२) : (१), (२) व (३) दिनांक २५ ऑक्टोंबर, २०२१ रोजी शेलूबाजार (ता. जि. वाशिम) येथील जुन्या वस्तीत तीन ठिकाणी चोरी झाली नसून एका ठिकाणी चोरी झाली असून सदर गुन्हयात रु.२ लक्ष ४० हजार किंमतीचा ऐवज चोरी झाला आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, मंगरुळपीर, जि. वाशिम येथे अप क्र. १०३३/२०२१, कलम ४५७, ३८० भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

म्हारळ वरप व कांबा (ता.कल्याण) येथे ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याबाबत

(१२) ३५२७४ (०७-०१-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हारळ, वरप व कांबा (ता.कल्याण) येथे मोठ्या प्रमाणात वस्ती वाढल्याने या ग्रामीण भागासाठी एक स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांनी केली असून सदर पोलीस स्टेशन तातडीने उभारावे अशी मागणी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामीण ठिकाणी काही घटना घडल्यास नागरिकांना ९ कि.मी. टिटवाळा येथे जावे लागत असल्याने नागरिकांना रात्री अपरात्री अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलीस स्टेशनसाठी म्हारळ येथील सर्वे नंबर ५३/५/अ येथे जागा उपलब्ध असून सदर जागा शासकीय असून ही जागा ताब्यात घेण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी पोलीस अधीक्षक यांना दिनांक ६ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी स्वतंत्र पोलीस स्टेशन उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-०४-२०२२) : (१) होय.
(२), (३) व (४) होय.

या प्रकरणात पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक २३/९/२०२१ च्या पत्राव्दारे पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रामीण) यांचेकडून सविस्तर प्रस्ताव मागविला होता. त्याअनुषंगाने पोलीस अधीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी आढळून आल्याने सदरहू त्रुटींची पूर्तता करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने दिनांक २७/१/२०२२ च्या पत्राव्दारे पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रा.) यांना कळविण्यात आलेले आहे.

उक्त प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यांनतर वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील गोरेगाव चेक नाका ते आरे कॉलनी येथे उभारण्यात आलेल्या उद्यानाबाबत

(१३) ३५३७९ (०७-०१-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरेचे सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी, पर्यावरणाच्या संरक्षणासाठी स्थानिक जनतेच्या व निसर्गप्रेमींच्या मागणीनुसार आरे प्रशासनाच्या परवानगीने शासनाच्या निधीतून गोरेगाव चेक नाका ते आरे कॉलनी (मुंबई) येथे दोन उद्यानांचे काम पूर्ण करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उद्यानाचे हक्क शासनाकडे अबाधित ठेवून तत्कालीन मंत्री महोदयांनी काळजीवाहू तत्वावर खाजगी स्वयंसेवी संस्थाना या उद्यानांची देखभाल करण्याच्या सूचना आरे प्रशासनास दिनांक २८ ऑगस्ट, २०१३ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत देवूनही ही उद्याने देखभालीसाठी स्वयंसेवी संस्थाना अद्याप देण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली व त्याचा तपशील काय आहे,
(४) तसेच, सदर उद्यानांची देखभाल करण्यास संस्था तयार असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधीनी कळवून देखील प्रशासनाने परवानगी न दिल्याने सदर उद्यानातील झाडे व औषधी वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री महोदयांना दिनांक ५ व ६ फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या पत्रव्यवहारानुसार दिनांक २८ ऑगस्ट, २०१३ रोजी तत्कालीन मा.मंत्री (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यामध्ये कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(६) असल्यास, सदरहू उद्याने संबंधित संस्थांना देखभालीकरिता हस्तांतरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (१९-०४-२०२२) : (१) होय, हे अशंत: खरे आहे. गोरेगांव चेकनाका येथे शहिद तुकाराम ओंबळे व वीर विनायक दामोदर सावरकर उद्यान उद्यानांचा पुर्नविकास म्हाडामार्फत करण्यात येत असून शहिद तुकाराम ओंबळे या उद्यानाचे काम पूर्ण झाले आहे. तथापि सदर उद्यान अद्यापपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांचे कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आले नाही. वीर विनायक दामोदर सावरकर या उद्यानाचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) हे खरे नाही.

(५) दिनांक २८.०८.२०१३ रोजी तत्कालीन मा.मंत्री (पदुम) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीतील इतिवृत्तानुसार साळस्कर उद्यानामागील मैदानाचा विकास करणेबाबत प्रस्ताव पाठविण्यात यावा व नियम तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे निर्देश दिलेले आहेत.

(६) उपरोक्त उद्यानांचे हस्तांतरण म्हाडामार्फत झाल्यानंतर उद्यानाच्या व्यवस्थापनाकरीता स्वयंसेवी संस्थांना देणे अथवा प्रवेश शुल्क आकारुन व्यवस्थापन करणेबाबत आरे प्रशासनामार्फत तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

मौजे दौंड (जि.पुणे) येथे नवीन पोलीस चौकी सुरु करण्याबाबत

(१४) ३५४८० (०७-०१-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दौंड शहर (जि.पुणे) गोपाळवाडी रोड परिसरात गजानन सोसायटी, भवानीनगर, शिवराज नगर, सरपंचवस्ती, दत्तनगर, भोईटेनगर, देवकीनगर पंचगंगा सोसायटी परिसरात मागील काही महिन्यांपासून वारंवार चोरीच्या घटना घडल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागात दौंड पोलीस स्टेशनची नवीन पोलीस चौकी सुरु करण्याबाबत येथील नागरिकांनी स्थानिक लोकप्रतिनिधींना विनंती केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पोलीस चौकी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-०४-२०२२) : (१) या परिसरात सन २०२१ ते अद्यापपर्यंत चोरी, घरफोडी, दरोडा या शिर्षकाखाली एकूण १२ गुन्हयांची नोंद झालेली आहे.

(२) व (३) होय. पोलीस चौकी सुरू करण्याच्या संदर्भात परिसराची पाहणी करण्यात आली असता, त्याठिकाणी शासकीय जागा उपलब्ध नाही. तसेच, मुख्याधिकारी, नगरपालिका दौंड यांना पोलीस ठाणे, दौंड यांचेस्तरावरून दिनांक २२/१०/२०२१ व्दारे मौजे सरपंच वस्ती,
ता.दौंड, जि.पुणे या ठिकाणी पोलीस मदत केंद्र सुरू करण्याकरीता जागा उपलब्ध करून देणेबाबत विनंती केली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केज, अंबाजोगाई (जि.बीड) तालुक्यात नवीन तलाठी कार्यालय सुरु करण्याबाबत

(१५) ३५८८० (०२-१२-२०२१). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज, अंबाजोगाई (जि.बीड) हया तालुक्यांमध्ये नवीन तलाठी सज्जा निर्माण झाले असुन तलाठी व मंडळ निरीक्षक यांचे नवीन सज्जे मंजूर होऊन दोन ते तीन वर्ष झाली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन सज्जाचे कार्यालय स्वतंत्र सुरु करुन कार्यालयात जवळच्या सज्याचे तलाठी नेमण्याचा प्रस्ताव तहसीलदार, अंबाजोगाई व केज यांनी दिला असल्याने त्यावर तातडीने कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना दिनांक २२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केज, अंबाजोगाई तालुक्यात नवीन तलाठी सज्जाचे कार्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात (०४-०३-२०२२) : (१), (२) व (३) होय, केज तालुक्यामध्ये नव्याने निर्माण करण्यात आलेल्या तलाठी सज्जे व मंडळ अधिकारी कार्यालयांचा कार्यभार लगतचे सज्जातील तलाठी व मंडळ अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे, तर अंबाजोगाई तालुक्यातील नवनिर्मित तलाठी सज्जे व मंडळ अधिकारी यांचा कार्यभार लगतच्या तलाठी व मंडळ अधिकारी यांचेकडे देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरखेड (जि.यवतमाळ) येथे ग्रामीण पोलिस स्टेशन निर्माण करण्याबाबत

(१६) ३६०४३ (१०-०१-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथे संवेदनशील पोलिस स्टेशन असल्याने शहर पोलिस स्टेशनेच विभाजन करुन ग्रामीण पोलिस स्टेशन निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२८-०४-२०२२) : (१) व (२) नाही.

याबाबतचा प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांचे नवीन स्वंयसेवक नेमण्याचे बंद केल्याबाबत

(१७) ३६०५७ (१०-०१-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आपातकालीन पथकाबरोबरच सर्वसामान्य नागरिकांकडून प्रशिक्षित स्वयंसेवक तयार करण्याचे उद्देशाने नागरी संरक्षण दलाची स्थापना शासनाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार सर्वसामान्य नागरिकांना प्रथमोपचार, अग्निशमन, आपत्ती व्यवस्थापन, शोध व बचाव कार्य, औद्योगिक क्षेत्रातील नागरी संरक्षण दल याबाबत प्रशिक्षण देऊन स्वयंसेवकांची भरती करण्याची जबाबदारी शासनाने राज्याच्या नागरी संरक्षण दलावर सोपविण्यांत आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही तत्कालीन पोलीस महासंचालक (नागरी संरक्षण दल) यांनी नवीन स्वयंसेवकांची भरती करण्याऐवजी सन २०१८ या कालावधीत ओळखपत्राचा गैरफायदा घेतल्याच्या कारणास्तव कार्यरत असलेल्या ४० हजार स्वयंसेवकांचे सदस्यत्व रद्द केले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सन २०१५ या कालावधीत स्वयंसेवक प्रशिक्षणच बंद केल्याने राज्याचे नागरी संरक्षण दल दुर्लभ (नामशेष) होण्याची भिती व्यक्त केली जात असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नागरी संरक्षण दलातील सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत व नवीन नेमणूका बंद केल्याप्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०७-०४-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नागरी संरक्षणाची स्थापना झाल्यापासून आज पर्यत अंदाजे ४०,००० इच्छुक नागरिकांना प्रशिक्षण देऊन स्वयंसेवक म्हणून त्यांची नोंदणी करण्यात आलेली होती. त्यापैकी संघटनेत क्रियाशील म्हणून साधारण १००० ते १५०० स्वयंसेवक कार्यरत होते.

नागरी संरक्षण संचालनालच्या दिनांक १३.०५.२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार सुधारीत भरती प्रक्रिया पध्दती निश्चित करण्यात येऊन आतापर्यत नोंदणी झालेल्या स्वयंसेवकांना नागरी संरक्षण संघटनेत पुन्हा क्रियाशील म्हणून काम करणाऱ्यासाठी पुनर्नोंदणीत सहभाग घेण्यासाठी सुचना केलेली होती.

सदर पुनर्नोंदणीत पात्र न झालेल्या तसेच अनुपस्थित राहिलेल्या नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकाचे सदस्यत्व आपोआप समाप्त झालेले आहे.

(४) हे खरे नाही.

स्वयंसेवक पुनर्नोंदणीसाठी प्रयत्न केले जात होते, परंतु त्यास अल्प प्रतिसाद मिळत असल्याकारणास्तव जनजागृती कार्यक्रम राबवून प्रशिक्षिण देण्यात आले आहे.

तसेच राज्यातील सर्व नागरी संरक्षण जिल्हयात शासकीय शाळा, महाविद्यालये, शासकीय/निमशासकीय कार्यालये, हॉस्पीटल यामध्ये मागील ४ वर्षात १,९२,३४४ विद्यार्थी, शिक्षक, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले व नवीन भरती केलेले ८२२८ होमगार्ड यांना प्रशिक्षित केले आहे.

तसेच पालघर जिल्हयातील डहाणू व तलासरी येथे भूकंपाचे धक्के जाणवत असल्याने तेथील ४३ गावांमध्ये १४,५१० नागरीकांना भूकंप व आपत्कालीन परिस्थितीत काय करावे याचे प्रशिक्षण दिले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मालेवाडा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील बोगस डॉक्टरांविरुद्ध कार्यवाही करण्याबाबत

(१८) ३६३२८ (१०-०१-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेवाडा (ता.कुरखेडा, जि.गडचिरोली) येथील मनोहर आत्राम सह तालुक्यातील ३१ बनावट डॉक्टरांची आरोग्य विभागाने पडताळणी केली, हे खरे आहे काय,

२) असल्यास, सदर मनोहर आत्राम व इतर बोगस डॉक्टरांची चौकशी करुन पोलीसांकडे तक्रार दाखल केल्यानंतरही बनावट डॉक्टर दवाखाने उघडून नागरीकांच्या जीवाशी खेळत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, उक्त बोगस डॉक्टरांविरुद्ध कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१९-०५-२०२२) : (१) आरोग्य विभागाने गावनिहाय बोगस वैद्यकिय व्यावसायिकांची पडताळणी करून बोगस वैद्यकिय व्यावसायिकाने दवाखाना थाटून वैद्यकिय व्यवसाय सुरू केल्याचे आढळून आल्याने ३ बोगस वैद्यकिय व्यवसाय करणारे व्यक्तीविरूध्द तालुका वैद्यकिय अधिकारी यांचे तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(२) सद्यस्थितीत गडचिरोली घटकात या संबधाने तक्रारी प्राप्त नाहीत.

(३) शासनाने निर्देशित केल्यानुसार बोगस डॉक्टरांविरुध्द पोलीस स्टेशन, पुराडा येथे गुन्हा नोंद क्र.१४/२०२१, कलम ४१९, ४२०, ४६८, ४७१ भा.द.वि. ३३, ३४, ३६, ३८ महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ अन्वये व पोलीस स्टेशन, कुरखेडा येथे गुन्हा नोंद क्र.१२४/२०२१ व गुन्हा नोंद कलम क्र.१२५/२०२१ कलम ३३६, ४१९, ४२०, भा.द.वि. सह कलम ३३ महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१, अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. गुन्हयाचा तपास चालू आहे. तसेच आरोग्य विभागाकडून अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होताच गुन्हे दाखल करण्याची तात्काळ कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला जिल्ह्यातील जुगार माफियांचा सुळसुळाट झाल्याबाबत

(१९) ३६४१५ (१०-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील जुगार माफियांचा सूळसुळाट झाला असून अनेक जुगार अड्ड्यांवर स्थानिक गुन्हे शाखेकडून माहे ऑगस्ट, २०२१ ते नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान अनेक ठिकाणी छापे मारले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील मध्यवर्ती नागरी वस्तीमधील रतनलाल प्लॉट चौकातील सूर्यामाथने संकुलात दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास जुगार अड्ड्यांवर छापा मारून लाखो रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील पाच वर्षात उक्त जिल्ह्यात किती जुगार अड्ड्यांवर पोलिसांनी धाड टाकून कोणती कारवाई केली आहे, तसेच जुगार माफियांचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-०३-२०२२) : (१) अकोला जिल्हयातील स्थानिक गुन्हे शाखेकडुन गुप्त माहितीवरुन माहे ऑगस्ट, २०२१ ते नोव्हेंबर २०२१ मध्ये व त्या दरम्यान एकूण ३७ छापे टाकण्यात आले. त्यामध्ये १०१ आरोपींवर कारवाई करुन त्यांचे जवळुन एकूण रु.३१,१९,८००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) होय,

सूर्यामाथने संकुलात दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पंचासमक्ष छापा टाकला असता एकूण ९ आरोपी हे जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपींकडून छाप्या दरम्यान नगदी रु.१५७७१६०/- व १२ मोबाईल किंमत रु.३८५०००/, रु १००००/-किंमतीचे कॅश काउंटींग मशिन व इतर साहित्य असे एकूण रु.२०,८२,१६०/- चा मुद्देमाल जप्त करुन आरोपींवर पोलीस स्टेशन, सिव्हील लाईन येथे गुन्हा नोंद क्र.८९१/२१ कलम ४,५ महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

३) मागील पाच वर्षात अकोला जिल्हयात जुगार अड्यांवर पोलीसांनी धाड टाकून खालील प्रमाणे कारवाई केली आहे.

अ.क्र.	वर्ष	दाखल	अटक आरोपी	जप्त मुद्देमाल
१	२०१७	९३३	१८००	५५४६७२३
२	२०१८	१०७७	११८५	९३७५३५८
३	२०१९	१०७५	१३१४	८४८७४५६
४	२०२०	१२४१	१५३६	१२४७२०७९
५	२०२१	१३०७	१७४६	१४०९६९६२

जुगार माफीयावर आळा घालण्याकरीता पोलीसांकडून वेळोवेळी गोपनीय माहिती काढून त्यांच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येते. तसेच जे गुन्हेगार वारंवार गुन्हे करतात त्यांच्याबाबत माहिती गोळा करुन त्यांच्यावर प्रभावी प्रतीबंधक कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) येथील उपजिल्हाधिकारी हे जनहिताची कामे करत नसल्याबाबत

(२०) ३७३५५ (१२-०१-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) उपजिल्हाधिकारी कार्यालय येथे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सातत्याने केज विधानसभा मतदार संघातील विविध विषयांबाबत दूरध्वनी व प्रत्यक्ष वारंवार भेटी देऊन पाठपुरावा केला मात्र उपजिल्हाधिकारी श्री.झाडके यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजिल्हाधिकारी, श्री.झाडके हे टाळाटाळ करत असून लोकप्रतिनिधींच्या पत्रावर फक्त संबंधित विभागास औपचारिकता म्हणून पत्र पाठवतात परंतु कोणतीही कार्यवाही करत नसल्यामुळे त्यांना लोकप्रतिनिधी यांनी सुचवलेल्या विषयावर कुठलेही गांभीर्य नसल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या नियम व निर्णयाप्रमाणे निर्णय घ्यावेत म्हणून उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांना पत्रव्यवहार केला परंतु सदर अनेक पत्रांवर उपजिल्हाधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नसल्याने सदर पत्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १४ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे पाठवले आहेत, हे ही खरे आहे काय,.

(४) असल्यास, या सर्व विषयाबाबत शासन निर्णय व शासन नियमाप्रमाणे निर्णय घेणे अपेक्षित असतांना श्री.झाडके हे जाणीवपूर्वक स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सुचवलेली नागरीक व शासनाच्या हिताची कामे तसेच नियमाप्रमाणे लोकउपयोगी जनहिताची कामे करत नसल्याने त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी मा.राजशिष्टाचार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १४ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनीधींनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (११-०३-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) उपविभागीय अधिकारी, अंबाजोगई, जि. बीड यांच्या कार्यपद्धतीवर व कामकाजाबाबत आक्षेप उपस्थित करणारे मा. लोकप्रतिनिधी यांचे दिनांक १४.११.२०२१ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनातील आक्षेपांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचा अहवाल प्राप्त झालेला आहे. सदर अहवालाची शासन स्तरावर छाननी केली असता, त्यामध्ये आढळून आलेल्या त्रूटींची पुर्तता करुन त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

कुलाबा (मुंबई) राज्य उत्पादन शुल्क विभागात दुय्यम निरिक्षक यांनी कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

(२१) ३७६७७ (१२-०४-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा (मुंबई) राज्य उत्पादन शुल्क विभागात काम करणारे दुय्यम निरिक्षक यांनी कार्यालयातील लिपीक व अधिकारी यांच्या त्रासाला कंटाळून रेल्वे रुळावर उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी लिहीलेल्या चिठ्ठीत त्यांना त्रास देणाऱ्या व्यक्तींची नावेही लिहीलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मयत व्यक्ती यांना औरंगाबादमध्ये बदली हवी असल्याने त्यांनी राज्य उत्पादन शुल्क वांद्रेच्या पी डिवीजनमधील निरीक्षकाला ३३ लाख रुपये दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणातील लिपिक, राज्य उत्पादक शुल्क विभाग, कुलाबा हे बेकायदा अफु बाहेरील व्यक्तींना देतो, ही सदरची बाब वरिष्ठांना समजली तर मयत व्यक्ती मोठ्या अडचणीत येवू शकतील कारण सर्व रजिस्टरवर सहया त्यांच्या असायच्या या सर्व तणावांमुळे मयत व्यक्तीने आत्महत्या केली असल्याचा संशय त्यांच्या कुटुंबियांनी व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीअंती राज्य उत्पादन शुल्क विभागातील संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-०५-२०२२) : (१) व (२) श्री.रमेश मोहिते, दुय्यम निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कुलाबा, मुंबई यांनी त्यांच्या कार्यालयातील लिपिक यांनी दिलेल्या मानसिक त्रासामुळे दिनांक २०.१२.२०२१ रोजी रेल्वे रुळावर उडी मारुन आत्महत्या केली आहे. सदर प्रकरणी बोरीवली रेल्वे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१६/२०२२ कलम ३०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) मयत यांनी आत्महत्या करण्यापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये निरिक्षक यांना ३३ लाख रुपये दिले असल्याचे नमूद केले आहे. परंतू यासंदर्भात तपास केला असता मयत इसम यांनी बदलीसाठी पैसे दिल्याबाबत अद्याप कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मिळून आलेला नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना गुन्हयांचे तपासामध्ये निष्पन्न झालेल्या आक्षेपार्ह बाबींवर त्यांचे स्तरावर योग्य ती चौकशी करुन संबंधितांवर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे-नाशिक महामार्गावरील सिन्नर बायपास रस्ता बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

(२२) ३८२३० (०१-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-नाशिक महामार्गावरील सिन्नर बायपास रस्त्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाने जमीन गट क्र.८९७ मधील श्री.चंद्रभान सांगळे यांचेसह ९ शेतकऱ्यांनी संपादित केलेल्या ९४ गुंठे जमिनीच्या नुकसान भरपाईची रक्कम बाधित शेतकऱ्यांना १३ वर्षे उलटूनही अद्यापपर्यंत शासनाने उपलब्ध करुन दिली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र सरकारच्या २०१३ च्या शासन निर्णयानुसार नविन दराप्रमाणे व शेजारील गट क्र.८९६ मधील शेतकऱ्यांस दिलेल्या दराप्रमाणे सदरहू बाधित नऊ शेतकऱ्यांना प्रत्यक्षात जमीनीची बिनचूक मोजणी करुन व क्षेत्र निश्चित करुन संपादित क्षेत्रानुसार नुकसान भरपाईची रक्कम तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२८-०४-२०२२) : (१) नाही.
(२) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), पाटबंधारे क्र.१ नाशिक या कार्यालयाचे पत्र जा.क्र. उजिभूस/पा.ब.क्र.१/कावि/९५५/२०२१ दिनांक २३.१२.२०२१ अन्वये उप अधिक्षक भूमी अभिलेख सिन्नर यांना सदर गट नं.८९७ ची पुर्नमोजणी करणे बाबत पत्र देण्यात आलेले आहे व मोजणी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) अशी बाब नाही.

सिन्नर (जि.नाशिक) येथील संजीवनीनगर भागातील एका युवतीने आत्महत्या केल्याबाबत

(२३) ३८९१५ (१२-०४-२०२२). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) येथील संजीवनीनगर भागातील एका २५ वर्षीय युवतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्यानंतर सात दिवस उलटूनही पोलिसांकडून कोणतीच कारवाई न केल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर युवतीस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी सर्वपक्षीयांनी पोलिस निरिक्षकांकडे दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुद्ध कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१८-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) उक्त प्रकरणी सिन्नर पो.स्टे. येथे दिनांक ३१.१२.२०२१ रोजी आकस्मिक मृत्यू रजि.नं.११५/२०२१ सीआरपीसी १७४ प्रमाणे दाखल केलेला आहे. उक्त प्रकरणी चौकशीत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सिन्नर पो.स्टे.गु.र.नं.०४/२०२२ भादंवि ३०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र किंवा राज्य शासनाने पायाभूत प्रकल्पासाठी विभागीय आयुक्तांना गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूकीचा परवानगीचा निर्णय घेतल्याबाबत

(२४) ३९१०४ (०७-०४-२०२२). श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा): सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र किंवा राज्य शासनाने पायाभूत प्रकल्प अथवा जलसंपदा प्रकल्पाच्या कामासाठी विभागीय आयुक्तांना आवश्यकता वाटल्यास रात्रीच्या वेळी देखील गौण खनिजाचे उत्खनन व वाहतूकीची परवानगी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र किंवा राज्य शासनाचे पायाभूत प्रकल्प अथवा जलसंपदा प्रकल्पाच्या कोणकोणत्या कामासाठी परवानग्या देण्यात येणार आहेत व महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या अधिनियमामध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२२) : (१) व (२) मंत्रीमंडळाच्या दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ६७ (२) मध्ये “केंद्र अथवा राज्य शासनाच्या पायाभूत अथवा जलसंपदा प्रकल्पाच्या कामाकरीता विभागीय आयुक्त यांना आवश्यकता वाटल्यास रात्रीच्यावेळी गौण खनिजाच्या उत्खननाची व वाहतूकीची परवानगी देता येईल” अशी सुधारणा करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करावयाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील विधानसभा सदस्य (श्री.शेलार) व मुंबई महानगरपालिकेच्या महापौर (सौ.पेडणेकर) यांना व त्यांच्या कुंटुंबियांना जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत

(२५) ३९२५० (१२-०४-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विधानसभा सदस्य श्री.आशिष शेलार व मुंबई महानगरपालिकेच्या महापौर सौ.किशोरीताई पेडणेकर यांना व त्यांच्या कुंटुंबियांना जीवे ठार मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी केली आहे काय, चौकशीअंती त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, याप्रकरणी धमक्या देणाऱ्यांचा शोध घेवून त्यांच्यावर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (२३-०५-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) श्री.आशिष शेलार, वि.स.स. यांना दिनांक ०६.०१.२०२२ रोजी आरोपीने फोनवरुन जीवे मारण्याची धमकी दिल्याने वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.नं.०६/२०२२, कलम ५०४, ५०६(२) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उक्त प्रकरणी आरोपिला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

सौ.किशोरीताई पेडणेकर, मा.महापौर, बृहन्मुंबई महानगर पालिका यांना व त्यांच्या कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी दिल्याने त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भायखळा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.७१४/२०२१, कलम ५०९, ५०६(२) भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हद्गाव (जि.नांदेड) येथे जमीन मालकांना संपादित जमिनीचा मोबदला मिळवून देण्याबाबत

(२६) ३९४५५ (०७-०४-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हद्गाव (जि.नांदेड) तालुक्यातील तत्कालिन उपविभागीय अधिकारी यांनी हद्गाव राष्ट्रीय महामार्ग तसेच नांदेड ते नागपूर रेल्वे मार्गाच्या कामाकरिता संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा मावेजा संबंधित जमीन धारकांना अद्याप दिला नसल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालिन उपविभागीय अधिकारी यांनी वकील, नायब तहसिलदार व नगरपरिषद कर्मचारी यांचेशी आर्थिक संगनमत करून संबंधित जमीन मालकांविरूध्द बनावट तक्रारी दाखल करून त्यांना हक्काच्या मोबदल्यापासून वंचित ठेवुन मोबदला स्वरुपात लाचेच्या स्वरुपात मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालिन उपविभागीय अधिकारी यांनी राष्ट्रीय महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदारांना हजारो ब्रास माती व मुरूमाचे उत्खनन करण्यास नियमबाह्यरित्या परवानगी दिल्याने त्यांच्या अशा गैरकारभाराबाबत त्यांचेवर कारवाई करण्याबाबत श्री.शेख जाकीर व शेख सगीर यांनी माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे तक्रार अर्ज सादर केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने हद्गाव तालुक्यातील तत्कालिन उपविभागीय अधिकारी यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करून त्यांचेवर योग्य ती कारवाई करून जमीन मालकांना हक्काचा मोबदला मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२८-०४-२०२२) : (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) अर्जदार श्री.शेख जाकीर शेख जाकीर रा बरकतपुरा ता.अर्धापूर यांचे दिनांक १०.११.२०२० रोजीचे निवेदन जिल्हाधिकारी नांदेड कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

प्रस्तुत निवेदनातील मुद्दे अन्य अर्जदाराने केलेल्या तक्रारी समान असल्याने सर्व मुद्दां बाबत अप्पर जिल्हाधिकारी नांदेड यांनी सदर प्रकरणी चौकशी केली असुन चौकशी अहवाला नुसार सदर प्रकरणी अनियमितता झाल्याचे दिसुन येत नाही. अर्जदारास सदर प्रकरणात यापुर्वी केलेल्या चौकशीच्या कार्यवाहीबाबत अर्जदार श्री.शेख जाकीर शेख जाकीर यांना जिल्हाधिकारी नांदेड कार्यालयाचे पत्र क्र.२०२०/मशाका-२/गौ.ख./टे-२/प्र.क्र.दिनांक ०७.१२.२०२० अन्वये कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा अंतर्गत प्रत्येक गावांसाठी किमान १५ विहिरींचे उद्दिष्ट प्रतिवर्षी ठेवण्याबाबत

(२७) ३९५५३ (०७-०४-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा (मनरेगा) अंतर्गत प्रत्येक गावांसाठी किमान १५ विहिरींचे उद्दिष्ट प्रतिवर्षी ठेवण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी व नागरीकांकडून शासनाकडे वेळोवेळी करण्यात आली असून सदर शेतकऱ्यांना विहिरी मंजूर करताना वर्षनिहाय फक्त पाच विहिरींचे उद्दिष्ट शासनाने ठरवून दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काही कारणास्तव या पाचही विहिरी लाभार्थ्यांकडून पूर्ण होऊ न शकल्यास पुढील वर्षी विहिरी अपूर्ण म्हणून त्या गावाला विहिरी मंजूर केल्या जात नाहीत किंवा मागच्या अपूर्ण विहीरी धरुन पाच विहिरीचे उद्दिष्ट पूर्ण केले जाते, परिणामी इच्छुक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित रहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थितीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (१३-०५-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा (मनरेगा) अंतर्गत प्रत्येक गावांसाठी किमान १५ विहिरीचे उद्दिष्ट प्रतिवर्षी ठेवण्याबाबत मागणी दिसून येत नाही, परंतु गावनिहाय / तालुकानिहाय उद्दिष्ट वाढवून देण्याबाबत मागणी प्राप्त झाली आहे.

शासन परिपत्रक दिनांक २८/८/२०२० अन्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये तिच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सिंचन विहिरीची कामे मंजूर करण्याबाबत कार्यपद्धती विषद करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भोकरधन (जि.जालना) तालुक्यातील हसनाबाद व जवखेडा येथे पशुवैद्यकीय रुग्णालयांची दुरावस्था झाल्याबाबत

(२८) ३९९७२ (०१-०४-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोकरधन, (जि.जालना) तालुक्यातील हसनाबाद व जवखेडा येथे पशुवैद्यकीय रुग्णालयांची दुरावस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दोन्ही पशुवैद्यकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असून हसनाबादेतील पशुवैद्यकीय रुग्णालयाची इमारतीही जीर्ण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दोन्ही पशुवैद्यकीय रुग्णालयातील अडचणी लवकरात लवकर दुर व्हाव्या यासाठी स्थानिक नागरिकांनी जिल्हा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना अनेक तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या तक्रारी तातडीने दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुनिल केदार (२५-०५-२०२२) : (१), (२), (३) व (४) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

हसनाबाद येथील पशुवैद्यकीय रुग्णालयाची इमारतीचे बांधकाम सन १९९३ मध्ये पूर्ण झालेले आहे. सदर इमारत दुरुस्ती सन २०१९-२० मध्ये करण्यात आलेली आहे.

पशुवैद्यकीय दवाखाना हसनाबाद व जवखेडा येथील पशुधन विकास अधिकारी पदाचा कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला असून त्याव्दारे नियमित सेवा पुरविण्यात येत आहे.त्यामुळे स्थानिक नागरिकांकडून तक्रारी केल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. त्याप्रमाणेच रिक्त पदे बदलीव्दारे / सरळसेवेने भरण्याचे संकल्पित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अंजनगाव (ता.सुर्जी जि.अमरावती) येथील कृषी कार्यालयातील कर्मचारी कार्यालयीन वेळ पाळत नसल्याबाबत

(२९) ४००५९ (०७-०४-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंजनगाव (ता.सुर्जी, जि.अमरावती) कृषी कार्यालयातील कार्यालय प्रमुख आणि कार्यालयीन कर्मचारी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहत नसल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अधिकारी कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने शेतकऱ्यांची अडचण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कार्यालयीन वेळा न पाळणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (११-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.
दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती सभागृह, अचलपूर येथे आढावा सभा आयोजित केली होती. सदर आढावा सभेस तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि सहाय्यक उपस्थित होते.
तसेच दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कार्यरत ११ पदांपैकी ६ अधिकारी/कर्मचारी पूर्वपरवानगीने रजेवर होते. तसेच स्वत: तालुका कृषि अधिकारी हे मध्यान्हपूर्व क्षेत्रभेटीवर होते आणि मध्यान्हानंतर कार्यालयात उपस्थित राहून त्यांनी कार्यालयीन कामकाज पार पाडले आहे. उर्वरित ४ कर्मचारीही कार्यालयात उपस्थित होते.
(२) व (३) हे खरे नाही.
विभागाचे मुख्य काम हे विस्ताराचे असल्याने कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना क्षेत्रीय दौऱ्यावर जावे लागते. तालुका कृषि अधिकारी हे वारंवार कार्यालयीन व क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या कृषि विषयक कामकाजाचा आढावा घेऊन त्यांना मार्गदर्शन करीत असतात. शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी कार्यालयामध्ये स्वतंत्र शेतकरी सन्मान कक्षही स्थापन करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईमध्ये वाहतूक पोलिसांवर हल्ल्यांचे प्रमाण वाढत असल्याबाबत

(३०) ४०२५८ (०७-०४-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये वाहतूक पोलिसांवर होणाऱ्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले असून वाहतुकीचे नियम सर्रास तोडून पोलिसांशी हुज्जत घालण्याचे प्रकार दिवसागणिक होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नागरिकांमध्ये पोलिसांविषयीची आदरयुक्त भीती कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

वाहतूक पोलीसांवर हल्ला करणाऱ्यांविरुध्द भा.दं.वि. संहितेअन्वये सन २०२० व सन २०२१ मध्ये अनुक्रमे २१ व २३ गुन्हे दाखल करण्यात आले असून सन २०१७ ते सन २०२२ दरम्यान सदर गुन्ह्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबई वाहतूक पोलीसांवर हल्ला करणाऱ्यांविरुध्द स्थानिक पोलीस ठाण्यांमार्फत भारतीय दंड विधान कलम ३३२ व ३५३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील गोधनाच्या संरक्षणासाठी वसतिगृह उभारण्याबाबत

(३१) ४०४७६ (११-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्यातील गोधनाच्या संरक्षणासाठी वैज्ञानिक उपाययोजना करण्यासाठी तसेच गायीसाठी वसतिगृहे उभारण्यात येणार असल्याचे मत केंद्रीय पशुसंवर्धन मंत्री, महाराष्ट्र राज्य एका जाहीर कार्यक्रमात व्यक्त केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घोषणेची दखल राज्य शासनाने घेऊन प्रत्येक शहर व गाव स्तरावर गायीसाठी एक वसतिगृह निर्माण करण्यासाठीचा मागणीचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर करण्यात येणार, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव तयार करताना कार्यक्रम राबविणारी यंत्रणा निर्माण करण्यासाठी पुरेशा निधी शासनाकडून देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील गायीच्या वसतिगृहासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२५-०५-२०२२) : (१) याबाबत केंद्र शासनाकडून कोणत्याही सूचना प्राप्त झालेल्या नाहीत.
(२), (३), (४), (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मानेगांव (ता.जळगांव जामोद, जि.बुलडाणा) येथील खाजगी मालकीच्या पडीक शेतीमध्ये अवैध विजेचे कनेक्शन केल्याबाबत

(३२) ४०६३७ (११-०४-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेगांव (ता.जळगांव जामोद, जि.बुलडाणा) गट न. ३६,३५२ ,३५३ व ३५९ येथील गावालगत खाजगी मालकीच्या पडीक शेतीमध्ये गेल्या २० वर्षापासून अतिक्रमण करून विटभट्टी व विटभट्टीसाठी मातीचे उत्खनन होत असल्याबाबत तातडीने उच्चस्तरीय सखोल चौकशी होण्याबाबत अखिल भारतीय लोकतंत्र सेनानी संघ जि.बुलडाणा यांनी शासनाकडे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी (बुलडाणा) यांच्याकडे तक्रारवजा निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जळगांव-जामोद महसूल अधिकाऱ्याच्या संगनमताने शेतीवरील अतिक्रमण व भ्रष्टाचार या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्यामार्फत शासना चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२२) : (१), (२) व (३) अखिल भारतीय लोकतंत्र सेनानी संघ, जि.बुलडाणा यांचे जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना दिनांक ३.१२.२०२१ रोजी प्राप्त निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी उपविभागीय अधिकारी, जळगाव जामोद व तहसिलदार, जळगाव जामोद यांना दिनांक ९.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

तसेच, या प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र.४६७०/२०२१ मध्ये दिनांक १८.११.२०२१ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांची समिती नेमण्यात आली. समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मौजे मानेगाव, झाडेगाव खांडवी पिंपळगाव काळे शिवारात आढळून आलेल्या ३९ विटभट्टी धारकांवर रू.२३,१७,५२०/- एवढ्या रकमेची दंडात्मक कार्यवाही केली आहे.

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनात गैरप्रकार झाल्याबाबत

(३३) ४०७४६ (०७-०४-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या (क्र.२११) भूसंपादनात दूरच्या जमिनी हायवेलगत असल्याचे दाखवून औरंगाबाद, बीड, जालना व उस्मानाबाद जिल्हयांत गैरप्रकार झाल्याचे दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्हयांतील १६७ एकर जमिनींसाठी ११६ कोटी ६८ लाख रुपयांचा मावेजा संबंधितांना देण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमिनीचे योग्य मूल्यमापन करुन मावेजा वाटप न केल्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास सुमारे ७० ते ७५ कोटी रुपयांपेक्षा अधिक भुर्दंड सहन करावा लागला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२८-०४-२०२२) : (१) प्रस्तुत विषयी स्थानिक वृत्तपत्रात आलेल्या बातमीनुसार प्राथमिक चौकशी संबंधित जिल्हयाच्या आतिरीक्त जिल्हाधिकारी यांच्या मार्फत करणेबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी निर्देश दिले होते. तथापी अद्याप सदर प्रकरणी अहवाल अप्राप्त आहे.
(२), (३) व (४) धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन कामात अनियमितता झाली किंवा कसे? याबाबत विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्या कार्यालयातील उप आयुक्त (भूसंपादन) यांच्या समन्वयाखाली, प्रस्तुत राष्ट्रीय महामार्ग क्र.२११च्या भूसंपादनाबाबत, चौकशी समिती शासनाच्या ज्ञापन क्र.विसअताप्र-२०२२/प्र.क्र.२८/अ-४, दिनांक २८ एप्रिल, २०२२ नुसार नेमण्यात आलेली आहे.
प्रस्तुत चौकशी समितीने सदर प्रकरणाची सखोल व विस्तृत चौकशी, तपासणी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून करावयाच्या कारवाईचा अहवाल शासनास सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय महामार्ग कुंदाळा ते वझर या कामासाठी अजयदिप कंस्ट्रक्शन कडून शेततळे न करता गौण खनिज उत्खन्न केल्याबाबत

(३४) ४०८२६ (०७-०४-२०२२). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ अ कुंदाळा ते वझर या कामासाठी अजयदिप कंस्ट्रक्शन कडून २९ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासन तरतुदीनुसार शेततळे करणे अनिर्वाह असताना सुध्दा शेततळे न करता गौण खनिज उत्खनन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैधरित्या गौण खनिज उत्खनन केल्याने शासनाचा महसुल बुडाला हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अजयदिप कंस्ट्रक्शन कडून २९ नोव्हेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास शासन तरतुदीनुसार शेततळे करणे आवश्यक असताना एकही शेततळे करण्यात न आल्याचा अहवाल कृषी विभागाकडून प्राप्त असूनही त्याबाबत महसूल विभागाकडून कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अजयदिप कंस्ट्रक्शनविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) राष्ट्रीय महामार्ग क्र.१६१ अ कुंदाळा ते वझर या महामार्गाचे संबंधित कंत्राटदार यांनी दिनांक १४.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये तालुका कृषी अधिकारी, मुखेड यांना राष्ट्रीय महामार्गालगतच्या शेतामध्ये शेततळेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मृद व जलसंधारण विभागाच्या दिनांक २९.११.२०१७ च्या शासन निर्णयानुसार शेततळ्यामधून उपलब्ध झालेले गौण खनिज राष्ट्रीय महामार्गाच्या कामासाठी विनामुल्य देण्याची तरतुद करण्यात आली आहे. परंतु, सदर शेततळ्यास परवानगी मिळाली नसल्यामुळे संबंधित कंत्राटदार यांनी एकूण २३,७०० ब्रास मुरूम गौण खनिजाचे उत्खनन केल्यापोटी रू.९७,१४,२००/- इतकी स्वामित्वधनाची रक्कम शासनजमा केली आहे.

चांदुर रेल्वे उपविभाग (जि. अमरावती) येथील तलाठी मंडळ अधिकारी कार्यालय वजा निवासस्थान येथील बांधकामात झालेल्या भ्रष्टाचाराबाबत

(३५) ४०९९४ (०७-०४-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदुर रेल्वे उपविभातंर्गत तिन्ही तालुक्यात सन २०१५-१६ या कालावधीत ग्रामीण स्तरावर तलाठी व मंडळ अधिकारी यांचे कार्यालय निवास्थान बांधण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तलाठी,मंडळ अधिकारी यांच्या वेतनातून देखभालीसाठी रक्कम वसूल केली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निकृष्ठ दर्जाचे बांधकाम केल्यामुळे सहा वर्षात निवास्थानाची दुरवस्था झाली असून फरश्यांना तडे पडणे तसेच शौचालयाच्या सेफ्टीक टॅंक उघडे पडल्याने कर्मचाऱ्यांना राहण्यास योग्य नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन नियमानुसार कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी किमान ४२० चौरस फुट इतकी जागा आवश्यक असतांना त्यांचे उल्लंघन करुन २९० चौरस फूट बांधकाम करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कर्मचाऱ्यांचे बंद केलेले घरभाडे पुन्हा सुरु करुन निकृष्ठ दर्जाचे बांधकाम करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (०२-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

(५) कार्यकारी अभियंता यांच्या अहवालानुसार निवासस्थाने उत्कृष्ट व माणकानुसारच बांधण्यात आलेले आहे व पुर्ण निवासस्थाने राहण्यास योग्य असल्याबाबतचा अहवाल कार्यकारी अभियंता, अमरावती यांचे अभिप्राय प्राप्त असल्याने घरभाडे भत्ता कपात बंद करण्यात आलेला नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती जिलह्यातील श्री. पंजाबराव गुलाबराव सोनोने यांनी विना परवाना ब्लास्टिंग करत असल्याबाबत

(३६) ४११२८ (०७-०४-२०२२). श्री.रवि राणा (बडनेरा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील श्री. पंजाबराव गुलाबराव सोनोने यांनी खदान मालक ज्यांनी विना परवाना ब्लास्टिंग करत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा खदान मालक, संचालक निलेश चौरसिया यांच्याकडून जमीन परत मिळण्यासाठी अमरावती जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर करून उक्त मागणी केली आहे. त्यांची मागणी लक्षात घेता महसूल उपजिल्हाधिकारी अमरावती यांनी त्यांचे पत्र क्रमांक २६/२३/२०२२ दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास तहसीलदार अमरावती यांना उक्त जमीन परत मिळण्यासाठी आदेश दिले असून लोकप्रतिनिधी यांना मिळालेली प्रत पुन्हा त्यांचे स्वीय सहाय्यक उमेश ढोणे यांनी तहसिलदार, अमरावती यांना देऊन पुन्हा उक्त मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) अर्जदार यांनी त्यांची जमिन परत मिळण्याबाबतचे जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे प्राप्त झालेले निवेदन जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक २५.०१.२०२२ च्या पत्रान्वये कार्यवाहीसाठी तहसिलदार, अमरावती यांना पाठविण्यात आले. त्यांनुषंगाने तहसिलदार, अमरावती यांनी त्यांचा अहवाल दिनांक ०६.०२.२०२२ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांना सादर केला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

भोर (जि.पुणे) तालुक्यातील श्रेणी-१ च्या पशुवैद्‌यकिय उपकेंद्र इमारत व पशुवैद्‌यकिय अधिकारी निवास इमारतीच्या दुरुस्तीबाबत

(३७) ४११६३ (०१-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हातनोशी (ता.भोर) तसेच मौजे माले (ता.मुळशी, जि.पुणे) येथील श्रेणी-१ चे पशुवैद्‌यकिय उपकेंद्र असून या उपकेंद्राच्या इमारती व पशुवैद्‌यकिय अधिकारी यांच्या निवासी इमारती जुन्या झाल्या असून पूर्णपणे मोडकळीस आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन्ही तालुक्यातील शेती हा मुख्य व्यवसाय असून शेतीपूरक पशुपालन व दुग्धव्यवसाय केल्यामुळे या दोन्ही पशुवैद्यकिय उपकेंद्राच्या इमारती व अधिकारी यांच्या निवासी इमारतींची दुरुस्ती होणे अतिशय गरजेचे असताना अद्यापही काम सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या उपकेंद्राच्या इमारती व पशुवैद्यकिय अधिकारी यांच्या निवासी इमारती संदर्भात शासनाने निधीची तरतूद करुन सदरील इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुनिल केदार (२५-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी- हातनोशी, ता. भोर, जि. पुणे या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागविण्यात आला असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये बांधकाम अथवा दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधीची मागणी करण्याचे प्रस्तावित आहे.

तसेच पशुवैद्यकीय दवाखाना मौजे माले, ता. मुळशी, जि. पुणे येथील श्रेणी - २ हा दवाखाना सन १९६५-६६ पासून ग्रामपंचायतीच्या जागेवर कार्यरत आहे. पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी इमारत बांधकामासाठी जागा मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु असून सदर जागा उपलब्ध होताच सन २०२२-२३ मध्ये जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करुन दवाखाना इमारत व निवासी इमारतीचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

उक्त दोन्ही पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये कर्मचारी निवासस्थान उपलब्ध नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तेल्हारा (ता.अकोट, जि.अकोला) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात औषधांचा तुटवडा असल्याने जनावराच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत

(३८) ४१४७३ (०७-०४-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल्हारा (ता.अकोट, जि.अकोला) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात औषधांचा तुटवडा होत असल्याने जनावराच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून त्यामुळे पशुपालक त्रस्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पशुधन अधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे औषधांची मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुनिल केदार (२३-०५-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नसून औषधी तुटवड्यामुळे जनावरांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याबाबतची बाब निदर्शनास आलेली नाही. पशुपालकांकडे जनावरांना नियमितपणे गरजेप्रमाणे औषधोपचार करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे पशुधन विकास अधिकारी यांचेमार्फत जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाकडे नियमितपणे औषधांची मागणी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अकोट (जि.अकोला) येथे मुंडगाव महसूल मंडळातर्गत चंद्रिका नदी पात्रातून रेतीचा होत असलेला अवैध उपसा

(३९) ४१४८० (०१-०४-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यातील मुंडगाव महसूल मंडळातर्गत चंद्रिका नदी पात्रातून रेतीचा अवैध उपसा होत असल्याने नदीपात्रात मोठमोठे खड्डे झाल्याने अपघात घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध उत्खननाबाबत नागरीकांनी शासनाकडे तक्रार दाखल केली असल्याने तलाठयाने पंचनामा करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. बाळासाहेब थोरात (०८-०४-२०२२) : (१), (२) व (३) मौजे मुंडगांव, ता.अकोट, जि.अकोला या महसूल मंडळातर्गत चंद्रीका नदी पात्रातून रेतीचा अवैध उपसा होत असल्याचे निदर्शनास आल्यानुसार अवैध उत्खननातून प्राप्त झालेल्या १० ब्रास रेतीचा दिनांक २३.११.२०२१ रोजी मौजे मुंडगाव येथील तलाठी यांनी पंचनामा केला असून, सदर जप्त केलेली रेती ही मौजे मुंडगाव येथील प्रधानमंत्री घरकुल लाभार्थी यांना घरकुल बांधकामाकरीता वाटप करण्यात आलेली आहे. नदी पात्रात खड्डे पडून अपघात घडल्याचे निर्दशनास आले नाही.

तसेच, सदर नदीपात्रातून अवैध मातीचे उत्खनन केल्याप्रकरणी एकूण ३ वाहनांविरूध्द पोलीस स्टेशन, अकोट (ग्रामीण) येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राज्यातील उपविभागीय कृषि आधिकारी कार्यालयांना टाळे लावले जाणार असल्याबाबत

(४०) ४२०२६ (११-०४-२०२२). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व उपविभागीय कृषि आधिकारी कार्यालयांना टाळे ठोकले जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने जिल्हा अधिक्षक कृषि आधिकारी यांची कार्यालये बळकट करण्याचा निर्णय घेतला असून ९० कार्यालये बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंडळ कृषि आधिका-यांना थेट तालुका कृषि आधिकारी कार्यालयात आणण्याचे शासनाचे प्रयोजन आहे काय,
(४) असल्यास, या बाबतीत नव्या आकृतीबंधावर मंत्रालय आणि कृषि आयुक्तायलयात काम सुरु आहे काय, याबाबत खुलासा करण्यात यावा,
(५) याबाबत, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२५-०४-२०२२) : (१), (२), (३), (४) व (५) कृषि विभागाचा (कृषि आयुक्तालय) सुधारीत आकृतीबंध (क्षेत्रीय स्तरापासून ते राज्यस्तरीय कार्यालयाचा) तयार करण्याचे काम सुरु आहे. प्रस्तावित आकृतीबंधात कृषि विभागातील योजनांची व्याप्ती, तंत्रज्ञानातील वृध्दी, कृषि विस्तार आणि फलोत्पादन व मृदसंधारण कार्याची वाढलेली गरज लक्षात घेऊन कार्यालयांचे बळकटीकरण करण्याचे विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

गोंदिया जिल्हयातील अर्जुनी/मोरगांव येथे खनिज संपत्तीचे उत्खनावर बंदी घातल्याबाबत

(४१) ४२२९३ (११-०४-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया येथील सडक, अर्जुनी व मोरगाव या तालुक्यामध्ये खनिज संपत्तीचा मोठया प्रमाणावर साठा असूनही सदर तालुके बफर झोन म्हणून घोषित झाल्यामुळे रेती, गिट्टी, बोल्डर व मुरुम खोदून वापरण्यावर शासनाने बंदी घातल्यामुळे तालुक्यातील सर्व खाजगी व शासकीय बांधकामास खनिजे उपलब्ध होत नसल्यामुळे बांधकाम पूर्णत: थांबले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खनिजावरील बंदीमुळे शासनाकडून मंजूर घरकुलांची कामे सुध्दा बंद पडली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांनी स्वत:चे शेतीचे खोलीकरण करुन काढलेल्या मातीचे ट्रॅक्टर व बैलगाडीही मोठया प्रमाणावर महसुल अधिकाऱ्यांनी जप्त केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, याबाबत लोकप्रतिनिधींनी संबंधित महसुल विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करुनही दखल घेतली गेली नसल्यामुळे सर्वच नागरिकांनी शासनाच्या चुकीच्या धोरणाविरुध्द व अधिकाऱ्यांच्या अरेरावी विरुध्द तालुका बंदची हाक दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागरिकांना व शासकीय कामे करणाऱ्या कंत्राटदारांना बांधकामास रेती, दगड व मुरुम उपलब्ध होत नसल्यामुळे बंद पडलेली बांधकामे व त्यामुळे नागरिकांचे व कंत्राटदारांचे होणारे आर्थिक नुकसान भरुन काढण्यासाठी होणारी मागणी व बंद पडलेली बांधकामे पूर्ण करण्यासाठी शासनाने खनिज उपलब्ध करुन देण्याबाबत पर्यायी व्यवस्था म्हणून दोन्ही तालुक्यातील नागरिकांना शासन इतर ठिकाणावरुन खनिज घरपोच उपलब्ध करुन देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव तालुक्यातील एकुण ०९ रेतीघाट पर्यावरण अनुमती मिळूण ०५ रेती घाट लिलावात गेले आहेत. तर उर्वरित ०३ रेती घाट घरकुल/ शासकीय आवास योजनेकरिता राखीव ठेवण्याचे नियोजित केले असून उर्वरित ०१ रेती घाटाची लिलावाची कार्यवाही सुरू आहे.

पंढरपूर (जि.सोलापूर) येथे उत्खनन विना परवाना नसल्याच्या कारणावरून महसूल प्रशासनाकडून ३० हून अधिक खडी क्रशर सील केले असल्याबाबत

(४२) ४२७२२ (१२-०४-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि. सोलापूर) येथे विना परवाना उत्खनन नसल्याच्या कारणावरून महसूल प्रशासनाकडून ३० हून अधिक खडी क्रशर सील केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे पंढरपूर तालुका खडी क्रशर संघटनेकडून खडी विक्री बंदचा निर्णय घेण्यात आला असून शहर व तालुक्यात सुरू असलेली बांधकामे थांबली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल प्रशासनाने खाण रॉयल्टी भरली नसल्याच्या कारणावरून अनेक खडी क्रशर सील आहेत परंतु रॉयल्टी भरण्यास खडी क्रशर चालक तयार असतानाही शासन अद्याप कोणतीही कार्यवाही करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रॉयल्टी भरून घेऊन तात्काळ खडी क्रशर सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२२) : (१) ता. पंढरपूर, जि.सोल्हापूर येथे खडीक्रशर धारक यांनी रॉयल्टी न भरल्यामुळे किंवा भरत नसल्यामुळे माहे डिसेंबर, २०२१ अखेर २१ खडीक्रशर सील करणेत आले आहे
(२) पंढरपूर तालुका खडीक्रशर संघटनेकडून खडी विक्री बंदचा निर्णय घेणेत आला असून शहर व तालुक्यात सुरू असलेली बांधकामे थांबली नाहीत कारण खडीक्रशर धारकांनी तयार केलेली खडी विक्री करणे चालु होते, शिवाय बांधकामे थांबली असलेबाबत निदर्शनास आलेले नाही.
(३), (४) व (५) मा. राष्ट्रीय हरीत लवाद पुणे बेंच यांनी दिनांक २०.१२.२०२१ रोजीच्या आदेशान्वये पर्यावरण अनुमतीशिवाय खाणकाम अल्प मुदत परवाना कायदेशीर नसलेचा आदेश पारीत केल्याने सोलापूर जिल्ह्यामध्ये गौण खनिज अल्प मुदत परवाना मंजूर करणेची कार्यवाही स्थगित करण्यात आलेली आहे.

रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील वाळू घाटांबाबत पर्यावरण विषयक जनजागृतीबाबत

(४३) ४३०४५ (१२-०४-२०२२). श्री.शिरीष चौधरी (रावेर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगाव) तालुक्यातील तहसिल कार्यालयामध्ये ६ वाळू घाटांबाबत पर्यावरण विषयक जनजागृती दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनजागृतीत वाळू घाटांची मुदत कालावधी हा दिनांक ६ जून, २०२२ पर्यंत असेल तसेच जो ठेकेदार वाळू घाटाचा ठेका घेईल त्याने दिवसा येथील धुळीच्या रस्त्यावर दोन वेळा पाणी मारण्यास आदेश देण्यात येथील व नियम घालून दिले जातील असे प्रशासनाने म्हटले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदरील आदेश येथे तातडीने जारी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२९-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) अशी बाब नाही.

(३) रावेर तालुक्यातील ६ वाळूगटांसाठी दिनांक २८/१/२०२२ रोजीच्या वाळू/रेती निर्गती धोरणानुसार लिलावाची कार्यवाही सुरु आहे. सदर वाळूगटांपैकी यशस्वी निविदाधारक/ लिलावधारक यांना वाळू वाहतूकीकरीता वापरत असलेल्या कच्च्या रस्त्यांवर पाणी मारण्यास जिल्हा प्रशासनाकडून आदेशीत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कृषी महाविद्यालय, अंबाजोगाई (जि. बीड) येथे शेतकऱ्यांसाठी पॅथॉलॉजी लॅब सुरु करणेबाबत.

(४४) ४३१०९ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी महाविद्यालय अंबाजोगाई, जि.बीड येथे शेतकऱ्यांसाठी आवश्यक असणाऱ्या औषधांची निर्मिती करून विक्रीस उपलब्ध करण्यासाठी आवश्यक ती पॅथॉलॉजी लॅब कृषी महाविद्यालय येथे सुरु करावी, यामुळे ट्रायकोडरमा, पीएसबी, रायजोबीन हे लिक्वीड स्वरुपात शेतकऱ्याना उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ०२ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दादाजी भुसे (२७-०४-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) कृषि औषधांची निर्मिती करुन विक्री करण्याकरीता पॅथोलॉजी लॅब कृषि महाविद्यालय, अंबाजोगाई येथे सुरु करण्यासंबंधी प्राथमिक बाबींचा विचार करुन त्यासंबंधी सहयोगी प्राध्यापक, वनस्पती विकृतीशास्त्र यांची नेमणुक महाविद्यालयात दि.२६.०७.२०२१ रोजी करण्यात आली असून सदर प्रयोगशाळा उभारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या संसाधनांचा सविस्तर विचार करुन त्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीच्या मागणी संदर्भात प्रस्ताव तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मराठवाड्यामध्ये जमीन महसूल व गौण खनिजातून वसुलीचे प्रमाण केवळ ३३.४९ टक्के झाल्याचे निदर्शनास आल्याबाबत

(४५) ४३१२६ (१२-०४-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यामध्ये जमीन महसूल व गौण खनिजातून वसुलीचे प्रमाण केवळ ३३.४९ टक्के झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाला मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतून जमीन महसूल व गौण खनिज करांच्या माध्यमातून मिळणारे ८३३ कोटी ६२ लाख रुपयांच्या वसुलीचे उद्‌दिष्ट देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना, अतिवृष्टी व वाळू घाटांचे लिलाव लांबणीवर पडल्याने महसूल विभागाकडून सदरची गौण खनिज कर वसुली जेमतेम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान विभागीय पातळीवरून जमीन व गौण खनिजातून उद्‌दिष्टापैकी एकूण २७९ कोटी २० लाख ८८ हजार रुपयांचा महसूल गोळा झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, महसूल वसुली उद्‌दिष्टपूर्ती पैकी अद्‌याप ५५४ कोटी रुपयांची वसुली बाकी असून या कर वसुलीकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२२) : (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे.

(५) व (६) महसूल उदिष्ठपुर्तीसाठी विभागीय आयुक्त, औरगांबाद यांनी संबंधित महसूली अधिकारी यांना सर्वोच्च प्राधान्याने वसूली करण्याबाबत सुचना दिलेल्या आहे.

पशुधन पदविका धारकांना VCI-Mahavet द्वारे लावलेले निर्बंध स्थगित करण्याबाबत.

(४६) ४३१५२ (२२-०३-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पशुधन पदविका धारकांना VCI-Mahavet द्वारे निर्बंध लावण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदवी धारकांनी शासनाला वेळोवेळी जनावराचे लसीकरण, बिल्ले टोचणे, कृत्रिम रेतन करणे तसेच प्रथम उपचार वाडी, वस्तीत जाऊन सेवा देऊन मदत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत त्यांनी काम बंद आंदोलन सुरु केले असून त्यांच्या विविध मागण्या राज्याचे पशुसंवर्धन मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (२५-०५-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) पशुवैद्यकीय पदविका धारकांनी नोंदणीकृत पदवीधर पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली पशुधनांचे वेळोवेळी लसीकरण, बील्ले टोचणे, कृत्रिम रेतन करणे, तसेच प्रथम उपचार वाडी, वस्तीत जाऊन सेवा दिली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

अशा स्वरुपाचे निवेदन शासनास प्राप्त झाले होते. मात्र आंदोलन त्यांनी स्थगित केले आहे.

(४) पशुधन पदवीका धारकांच्या विविध मागण्या संदर्भात निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील तलाठी यांनी वरीष्ठ अधिकारी यांच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

(४७) ४३२९४ (१३-०४-२०२२). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयातील अप्पर तहसिल विभागातील आवक-जावक तलाठी यांनी दिनांक २८ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आत्महत्येपूर्वी चार पानी सुसाईड नोटमध्ये वरिष्ठ अधिकारी सहकारी व काही तलाठी संघटना यांनी अपमानास्पद वागणूक व धमकी देवून खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची भिती दाखवल्यामुळे आत्महत्या केली असा उल्लेख आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात संबंधीत अधिकारी व कर्मचारी व तलाठी संघटना यांच्यावर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०५-२०२२) : (१) होय.
(२) व (३) होय. उक्त प्रकरणी पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे आकस्मिक मृत्यू क्र.७६/२०२१ कलम १७४ सीआरपीसी अन्वये प्रकरण दाखल करण्यात आले आहे. उक्त प्रकरणी मयत याने नोकरी असलेल्या ठिकाणी अप्पर तहसिल कार्यालय, औरंगाबाद येथील त्यांचे अधिकारी व सहकारी हे त्यांना खोटे कामे करण्यास भाग पाडतात म्हणून त्यांचे त्रासाला कंटाळून आत्महत्या करीत आहोत असे सुसाईड नोटमध्ये नोंद केलेली आहे. परंतू याबाबत त्यांचे कार्यालयातील अधिकारी व सहकारी यांच्याकडे विचारपुस केली असता त्यांनी दिलेल्या माहितीनुसार मयत यांना कोणीही आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे दिसून आले नाही तसेच ते नेहमी नैराश्येत रहात होते. त्या नैराश्येत त्यांनी आत्महत्या केली असल्याचे दिसून येते. सदर आकस्मिक मृत्यूची चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजेगाई, शहर वळण रस्ता कि.मी. ०/०० ते १/६०० मधील मावेजाधारकांना अवार्ड मधील देय रकमेच्या ३२.६० टक्के रक्कम वाटप न केल्याबाबत

(४८) ४३३९७ (०१-०४-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजेगाई (जि. बीड) शहर वळण रस्ता कि.मी. ०/०० ते १/६०० संचिका क्रमांक ५/९२ मधील शासनाकडुन येणे बाकी रक्कम रु.८,०५,७६,४६४/- पैकी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई. यांना २,५९,६५,०००/- शासनाकडुन प्राप्त झालेला निधी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जा.प्र.क्र.४, अंबाजोगाई यांच्याकडे जमा करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमा मावेजा रक्कम संबंधिताना तातडीने वाटप करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई. यांना पत्र.क्र. ८०४८ दिनांक ७ आक्टोबर, २०२१ व जा.क्र.१००८३ दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास तसेच दूरध्वनी वरून वारंवार पाठपुराव करुनही सदर जमा मावेजा उपजिल्हाधिकारी यांनी वाटप केला नाही व त्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधी यांना कळविलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मावेजाधारकांना अवार्ड मधील देय रकमेच्या ३२.६० टक्के रक्कम तातडीने वाटप करण्याबाबत आदेश देऊन उपजिल्हाधिकारी, यांची त्वरित चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर मावेजा वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली,वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२८-०४-२०२२) : (१) हे अंशत खरे आहे.
(२) होय, भुधारकांची मालकी निश्चित नसल्याने मावेजा वाटपास तांत्रिक अडचण येत आहे.
(३) जिल्हाधिकारी बीड यांचे दिनांक ०२.०३.२०२२ च्या पत्रान्वये सदर प्रकरणी नियमानुसार तात्काळ कार्यवाही अनुसरण्यात यावी व तसा अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी बीड कार्यालयास सादर करणेबाबत संबंधितांस कळविण्यात आलेले आहे.
(४) मावेजा वाटपाबाबत कार्यवाही सुरू आहे. व भूधारकांच्या मालकी निश्चित करणेसाठी सुनावणी घेण्यात येत आहेत.
(५) अशी बाब नाही.

मातोश्री ग्रामसमृद्धी शेत व पाणंद रस्ते योजना राबविण्याबाबत

(४९) ४३६६६ (०७-०४-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मातोश्री ग्रामसमृद्धी शेत व पाणंद रस्ते योजना राबविण्याबाबतच्या शासन निर्णय दिनांक ३० मार्च, २०२१ व दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ च्या संदर्भातील खडीकरणसह पक्का रस्ता तयार करण्याच्या कामांमध्ये यंत्र सामुग्रीद्वारे मातीकाम अनुज्ञेय आहे किंवा कसे यासह मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२१ च्या पत्राद्वारे व दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्मरणपत्राद्वारे अप्पर मुख्य सचिव (रोजगार हमी योजना), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, लातूर यांनी मागणी केलेले मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळविण्याबाबत विलंब होत असल्याने अभिसरण व विविध योजनेंतर्गत स्थानिक पातळीवर शेत रस्त्यांची माती कामे रखडल्याने औसा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी रोजगार हमी योजना मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच अप्पर मुख्य सचिव, रोजगार हमी योजना, मंत्रालय, मुंबई व संबंधित अधिकारी यांच्याकडे वारंवार समक्ष भेटून व भ्रमणध्वनीद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी शासनास किती कालावधी लागेल तसेच यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (२०-०५-२०२२) : (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) शासन पत्र दि.२४/०२/२०२२ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोंदिया जिल्हयात डोंगर परिसरात अवैध उत्खनन होत असल्याबाबत

(५०) ४३६८१ (१२-०४-२०२२). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्हयात डोंगर परिसरात डोंगरांना सुरुंग लावून राजरोसपणे अवैध उत्खनन सुरु असून याकडे महसूल व वनविभागाचे दुर्लक्ष असल्याने नैसर्गिक संकटे वाढणार आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध उत्खनन थांबविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.